लोकमत



विद्या प्रतिष्ठान कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील बी.बी.ए. आणि क्विकहिल फाउंडेशन या दोन संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

# विद्या प्रतिष्ठानचे विद्यार्थी गिरवणार सायबरचे धडे

## कमवा व शिका उपक्रमांतर्गत सामंजस्य

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य बरोबरच सामाजिक, व व्यावहारिक अनुभवातून सायबर सुरक्षेचे धडे मिळणार आहेत. या उपक्रमाचे दुसरे वर्ष आहे. महाविद्यालयातील बी.बी.ए. (सी.ए.) विभाग आणि क्विकहिल फाउंडेशन या दोन संस्थेमध्ये कमवा आणि शिका या उपक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे आणि क्विक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के यांनी स्वाक्षरी केली.

करारांतर्गत चालणाऱ्या या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालयात तसेच सार्वजनिक ठिकाणी जाऊन समाजातील सर्व घटकांमध्ये सायबर जागृतीचे काम करावयाचे आहे. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील सलमा शेख या शिक्षक समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत व शिवानी छेडे, सागर मेरावी, रितेश धापटे, ऋतुजा कळसकर हे विद्यार्थी क्लब मेंबर म्हणून काम पाहणार आहेत.

सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. भरत शिंदे , उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे , डॉ. लालासाहेब काशीद, बी.बी.ए विभाग प्रमुख महेश पवार, बी.एस.सी. विभाग प्रमुख गजानन जोशी, बी.एस.सी. विभाग प्रमुख किशोर ढाणे, गौतम कुदळे, डॉ. जगदीश सांगवीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, अक्षय भोसले, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे, अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले. या करारासाठी विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या विश्वस्त सुनेत्रा पवार, उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, खजिनदार युगेंद्र पवार, सचिव ॲड. नीलिमा गुजर, डॉ. राजीव शहा, किरण गुजर, मंदार सिकची, रजिस्ट्रार श्रीष कंबोज यांनी महाविद्यालयातील सर्वांचे हार्दिक अभिनंदन केले.